# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,

Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170,73

**Website** : www.muhs.ac.in, **E-mail** : sw@muhs.ac.in

MUHS

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल.,एलएल.बी.,पी.जी.डी.एच.आर.)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Sriram kulkarni**
**(B.S.L, LL,B., P.G.D.H.R)**
**offg.Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/ ८९६ /२०२० दिनांक: १५/०९/२०२०

"परिपत्रक क्र.१७/२०२०"

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

**विषय** : संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेबाबत...

**महोदय/ महोदया,**

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्याला काही गंभीर आजार झाल्यास किंवा दुदैवाने त्याचा काही अपघात झाल्यास किंवा अपघातामुळे इजा झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास किंवा दुदैवाने अपघात किंवा आजारामुळे अपमृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांच्या होणाऱ्या हानीची अंशतः का होईना भरपाई व्हावी या हेतूने संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना सुरु करण्यात आली आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमधील पदवी, पदविका व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या सर्व नियमित विद्यार्थ्यांना ही योजना लागु करण्यात आली आहे.

संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेच्या अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे तसेच त्यात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशिल विद्यापीठाच्या **www.muhs.ac.in** या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2020-21 उपलब्ध आहे.

प्र. संचालक
विद्यार्थी कल्याण

**प्रत माहितीस्तव** : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

**सोबत** : १) संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना नियमावली
२) दावा अर्ज (क्लेम फॉर्म)
३) वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

# - संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना नियमावली -

**प्रस्तावना :** विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला काही गंभीर आजार झाल्यास किंवा दुदैवाने त्याचा काही अपघात झाल्यास किंवा अपघातामुळे इजा झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास किंवा दुदैवाने अपघात किंवा आजारामुळे अपमृत्यु झाल्यास त्याच्या कुटूंबियांच्या होणाऱ्या हानीची अंशत: का होईना भरपाई व्हावी या हेतूने संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना सुरु करण्यात आली आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमधील पदवी, पदविका, व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या सर्व नियमित विद्यार्थ्यांना ही योजना लागू करण्यात आली आहे.

१) सदर योजनेअंतर्गत विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याच्या मृत्युप्रकरणी त्याच्या पालकांना किंवा वारसदारांना देण्यात येणारे अर्थसहाय्य अनुदान विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात यावी.

२) सदर योजना विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयातील पदवी, पदविका, आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या स्तरावरील नियमित शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना लागु असेल.

३) विद्यापीठांतर्गत नियमित स्वरुपात विद्यार्थ्याचा प्रवेश घेतल्याचे दिनांकापासून ते संबंधीत विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम पुर्ण होईपावेतोच्या दिवसापर्यंत सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

४) **विद्यार्थ्याचा अपघातामुळे, नैसर्गिक आपत्तीमुळे** (उदा. पूर, भूकंप, आग, वीज पडून इ.), हृदय विकाराच्या झटक्याने किंवा गंभीर आजाराने आकस्मित मृत्यु झाल्यास रु.२,००,०००/- (रुपये दोन लक्ष मात्र) इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या पालकांना/वारसदारांना अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

५) **विद्यार्थ्याचा अपघातामध्ये** कायम स्वरुपी एक हात किंवा एका पायाला अपंगत्व आल्यास किंवा एका डोळयाची कायमस्वरुपी दृष्टी गेल्यास रु.१,००,०००/- अथवा यापैकी कोणत्याही दोन अवयवांना कायम स्वरुपी अपंगत्व आल्यास रु.२,००,०००/- (दोनही डोळयांची दृष्टी जाणे/ दोन अवयवांना पुर्णपणे अपंगत्व) इतके अर्थसहाय्य जिल्हा शल्यचिकीत्सकाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अनुज्ञेय असेल.

६) **विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास** दुखापतग्रस्त अवयवावर मोठी शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास (उदा.मेंदू, हृदय, यकृत, फुफ्फुस इ. अवयवांवरील शस्त्रक्रीया) उपचारासाठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम खर्चाची प्रतीपुर्ती देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

७) **विद्यार्थ्यास गंभीर आजार झाल्यास** (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड किंवा इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) अशा आजाराच्या उपचाराकरीता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम खर्चाची प्रतिपूर्ती देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल.

८) **विद्यार्थ्याचे अपघातात** शरीराचे कुठलेही हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामुळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागली असल्यास होणाऱ्या खर्चाइतकी किंवा जास्तीत जास्त रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) इतक्या खर्चाची रक्कम प्रतिपुर्ती देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल. तसेच विद्यार्थी किरकोळ अपघात झाल्यास तो जर २४ तासापेक्षा जास्तवेळ रुग्णालयामध्ये दाखल असेल तर अशा स्थितीत प्रत्यक्ष खर्च किंवा जास्तीत जास्त रु. २०००/- (रुपये दोन हजार मात्र) यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम खर्चाची प्रतिपुर्ती देयके सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून म्हणून अनुज्ञेय असेल.

९) विद्यार्थ्याचे मुत्रपिंड निकामी झाले असल्यास त्याकरीता एखादया विद्यार्थ्यास डायलिसीस करावे लागत असल्यास एका महिन्यातून कमाल चार वेळा डायलीसीस करण्याकरीता प्रती डायलीसीस जास्तीत जास्त रु.२,०००/- ईतके अर्थसहाय्य खर्चाची देयके सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल.

१०) नुकसानीचे स्वरुप व त्याकरीता निर्धारित अर्थसहाय्याची रक्कम दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

**संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना**

| अ.क्र. | नुकसानीचे स्वरुप | भरपाई / अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचा अपघाताने / नैसर्गिक आपत्तीने / गंभीर आजाराने मृत्यु झाल्यास | रु.२,००,००० |
| २ | कायम स्वरुपी अपंगत्व (दोन्ही डोळयांची पूर्णतः दृष्टी जाणे / दोन अवयवांना पुर्णपणे अपंगत्व ) | रु.२,००,००० |
| ३ | कायम स्वरुपी एका अवयवाला पूर्णतः अपंगत्व (एका डोळयाची दृष्टी जाणे किंवा एका अवयवाला अपंगत्व) | रु.१,००,००० |
| ४ | **अपघात झाल्यामुळे मोठी शस्त्रक्रिया करावी लागली असल्यास** (उदा.मेंदू, हदय, यकृत, फुप्फुस इ. किंवा इतर अवयवांवरील मोठी शस्त्रक्रीया) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ५ | **विद्यार्थ्याच्या गंभीर आजारावरील उपचारास** (उदा. हदयविकाराचा झटका, हदयउपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड व इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ६ | क) अपघातात विद्यार्थ्याचे हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर इतर कारणामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामूळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागल्यास | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.१०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ७ | ड) अपघातात विद्यार्थी २४ तासापेक्षा जास्तवेळ हॉस्पिटल मध्ये दाखल असल्यास | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.२,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ८ | मुत्रपिंड निकामी झाल्यामुळे डायलीसील करावे लागत असल्यास | एका महिन्यातून कमाल चार वेळा डायलीसीस - प्रत्येक डायलीसीस करीता रु. २,०००/- |

११) उपरोक्त मुददयांमध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त अपघातामध्ये शरीराचे काही अवयव निकामी झाले असल्यास किंवा अपंगत्व आले असल्यास अशा प्रस्तावांसाठी विद्यापीठाने त्या प्रयोजनाकरीता गठीत केलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अर्थसहाय्याची रक्कम अनुज्ञेय असेल.

१२) विद्यार्थ्याचा अपघात किंवा मृत्यु झाल्यास किंवा विद्यार्थ्याच्या गंभीर आजाराविषयी महाविद्यालयाला कळविण्यात आले असेल तर महाविद्यालयाने प्रथम स्तरावर १० दिवसाच्या आत टपालाद्वारे किंवा ई-मेलद्वारे विद्यापीठास त्याबाबत कळविणे आवश्यक असेल.

१३) महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यासाठी दुसरी एखादी विमा योजना लागु केली असल्यास त्याचा या योजनेशी संबंध राहणार नाही. या योजनेअंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य ही स्वतंत्र बाब असेल.

१४) विद्यापीठाने कोणत्याही विमा कंपनीशी करार न करता दि.२९/०३/२०१२ पासुन सदर योजना विद्यापीठामार्फत राबविण्यात येणार असल्याने या तारखेनंतर विद्यार्थ्याचा अपघात किंवा मृत्यु झाल्यास किंवा गंभीर आजाराचा उपचार घेत असल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठाने या प्रयोजनाकरीता गठित केलेल्या समितीच्या सदस्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार निकाली काढण्यात येतील.

१५) सदर योजनेअंतर्गत प्राप्त अर्थसहाय्याचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत अशा प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननी दरम्यान प्रस्तावात काही अपुर्तता किंवा त्रूटी असल्यास सदर बाबींची पूर्तता करणेकरीता संबंधितांस किंवा संबंधीत महाविद्यालयास प्रशासकीय स्तरावरुन कळविण्यात येईल. प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव परिपूर्ण आढळून आल्यास असा प्रस्ताव उक्त योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता खालीलप्रमाणे गठीत केलेल्या समितीसमोर सादर करण्यात येईल. सदर समितीने घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | मा. प्रति कुलगुरु | सदस्य |
| ३ | कुलसचिव | सदस्य |
| ४ | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ५ | विधी अधिकारी | सदस्य |
| ६ | संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

१६) विद्यार्थ्याचा मृत्यु झाला असल्यास किंवा अपघातात कायमचे अपंगत्व आल्यास किंवा अपघाताच्या उपचारासाठी किंवा गंभीर आजाराच्या उपचारासाठी किंवा अपघातात हाड मोडले असेल किंवा शस्त्रक्रिया करावी लागली असल्यास किंवा डायलीसीस करीता सदर योजनेअंतर्गत प्रस्तावासोबत सादर करावयाचे दस्तऐवज खालीलप्रमाणे :

अ) मृत विद्यार्थ्याच्या पालकांनी त्यांचा पाल्य ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत अर्ज सादर करावा. तसेच अपघातग्रस्त, गंभीर आजारी, शस्त्रक्रिया झालेल्या किंवा मुत्रपिंड निकामी झालेल्या विद्यार्थ्याने तो ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत अर्ज सादर करावा.

ब) वैद्यकीय प्रमाणपत्र (नमुना अर्ज) मधील सर्व रकान्यांमध्ये मृत/ अपघातग्रस्त/ अपघातामुळे कायमस्वरुपीचे अपंगत्व आलेल्या/ शस्त्रक्रिया झालेल्या/ मुत्रपिंड निकामी झालेल्या विद्यार्थ्याची पुर्ण माहिती भरणे आवश्यक असेल. तसेच, त्यावर वैद्यकीय अधिकाऱ्याचा योग्य ठिकाणी स्वाक्षरी व शिक्का, पत्ता व दूरध्वनी क्रमांक नमूद असावा.

क) **विद्यार्थ्याचा अपघातात मृत्यु झाला असेल** तर अ) एफ.आय.आर, पोलिस पंचनामा, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

ड) **विद्यार्थ्याचा अपघात झाला असल्यास** एफ.आय.आर व पोलीस पंचनाम्याची साक्षांकीत प्रत.

क) **विद्यार्थी आजाराने किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे मृत पावला असेल** तर नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचे प्रमाणपत्र आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रामध्ये विद्यार्थी केव्हापासून कोणत्या

आजाराने आजारी होता किंवा कोणत्या नैसर्गिक आपत्तीनमुळे मृत झाला याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

ख) अपघातामुळे कायमचे अपंगत्व आले असल्यास जिल्हा शल्य चिकीत्सकांनी दिलेले अपंगत्व प्रमाणपत्र (अपंगत्व कोणत्या कारणाने आले व शरीराचे कोणते अवयव किती टक्के निकामी झाले याचा स्पष्ट उल्लेख असावा) तसेच, अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्याचे ४×६ सें.मी. आकाराचे दोन रंगीत छायाचित्रे. (छायाचित्रामध्ये शरीराचे कोणते अवयव निकामी होऊन अपंगत्व आले त्या भागाचे दर्शनी छायाचित्र सादर करावे.)

ग) अपघातग्रस्त/गंभीर आजारी/शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यास रुग्णालयातून सोडल्याचा (Discharge Card) वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी शिक्क्यासह दाखला. उपचारासाठी कराव्या लागलेल्या विविध चाचण्यांचे अहवाल व देयके (Investigation Reports & Bills) , वैद्यकीय देयके, मेडीकल स्टोअर्सची देयके, तपासणी अहवाल क्रमवार लावून सादर करावेत.

घ) उक्त कागदपत्रांची एकत्रितरीत्या पुर्तता करुन, सदर कागदपत्रे संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांनी साक्षांकीत करुन विद्यार्थ्यांचा मृत्यु झाल्यापासून/ उपचारानंतर रुग्णालयातून डिसचार्ज केल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा.

१७) अपघाताच्या कारणास्तव/आजारावरीन उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णालयातील स्वतंत्र खोलीचे भाडे, रुग्णवाहीकेचे भाडे, विशेष आहार, टॉनिक, डिसचार्ज नंतरच्या औषधांची देयके इ. देयके सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्यासाठी गृहीत धरले जाणार नाही.

१८) प्रस्तावामध्ये विद्यार्थ्याचा मृत्यु झाला असल्यास त्याच्या पालकाचे/वारसदाराचे अथवा इतर सर्व प्रकरणी विद्यार्थ्याचे ज्या बँकेत खाते असेल त्या बँकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी कोड, बँकेची शाखा, बँकेचा पूर्ण पत्ता नमूद करणे अनिवार्य असेल जेणे करुन दावाधारक/वारसदार अथवा विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्याची रक्कम ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरने (आरटीजीएस) जमा करणे सोईस्कर होईल.

**१९) योजनेत खालील बाबींचा समावेश असणार नाही :**

**I. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वीचे आजार किंवा अपंगत्व ;**

**II. भ्रमिष्टपणा ;**

**III. आण्विक दुर्घटना ;**

**IV. अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात / मृत्यु ;**

**V. आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे ;**

**VI. गुन्हयाच्या उद्देशाने कायदयाचे उल्लंघन करतांना झालेला अपघात / दुखापत / मृत्यु ;**

**VII. विद्यार्थ्याचा बेकायदेशीर कृत्यामध्ये असलेल्या सहभागामुळे झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;**

**VIII. महाविद्यालयाच्या नियमानुसार बेशिस्त वर्तनामुळे / बेकायदेशीर आंदोलनामध्ये सहभागामुळे झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;**

**IX. शर्यती व साहसी खेळ या दरम्यान झालेला दुखापत / अपघात / मृत्यु ;**

२०) योजनेच्या अनुषंगाने प्रस्तावासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची व विद्यार्थ्याच्या पालकांची तसेच अधिष्ठाता/प्राचार्याची असेल. एखादया कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रस्ताव अपात्र ठरविल्यास विद्यापीठ जबाबदार नसेल.

२१) विद्यापीठा मार्फत दरवर्षी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहुन संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांनूसार अर्थसहाय्याच्या रक्कमेत बदल करण्याचे विद्यापीठास अधिकार असतील.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना
## क्लेम फॉर्म (CLAIM FORM)

विद्यार्थ्याचा प्राणघातक अपघात झाला किंवा अपघातात अपंगत्व आल्यास किंवा अपघातात/नैसर्गिक/गंभीर आजाराने मृत पावल्यास/आजारी असल्यास प्रस्तावासोबत क्लेम फॉर्म जोडावा.

**१) दावा धारकाची माहिती :**

अ) संपुर्ण नाव : ..............................................................................................

ब) पुर्ण पत्ता : ..............................................................................................

क) दूरध्वनी क्र. : .................................... ड) व्यवसाय : ....................................

ड) विद्यार्थी मृत पावला असेल तर विद्यार्थ्या सोबतचे नाते (आई,वडील,भाऊ,बहिण इ.) : ..............................

इ) दावा धारकाचे बॅंक खातेवरील नाव : ........................................................ , बॅंकेच्या शाखेचे नाव व

पत्ता: ........................................................ , बॅंक खाते क्र. .................................. ,

बॅंक आय.एफ.सी.कोड. ......................

**२) गंभीर आजाराने मृत पावलेल्या/अपघातात मृत पावलेल्या/गंभीर आजार झालेला विद्यार्थ्याची माहिती**

अ) विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव : ..............................................................................

ब) महाविद्यालयाचे नाव : ..............................................................................

क) महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा दिनांक : ................. ड) सध्या शिकत असलेला अभ्यासक्रम व वर्ष : ..........

**३) अपघाताबद्दलचा/आजाराबद्दलचा तपशिल**

अ) अपघात/आजारी केंव्हा व कोणत्या ठिकाणी झाला (तारीख, वेळ व ठिकाण नमूद करावे) : ..............................
..............................................................................................................

ब) अपघाताचे/आजाराचे कारण आणि अपघातात झालेली दुखापत : ..................................................
..............................................................................................................

क) अपघात झाल्याबाबतची सुचना पोलिस स्टेशनला दिली होती का?दिली असल्यास पोलिस स्टेशनचे नाव नमूद करावे व FIR ची साक्षांकित प्रत जोडावी : ..........................................................
..............................................................................................................

ड) विद्यार्थी अपघातात मृत्यु पावला असेल तर, मृत विद्यार्थ्याचे शव विच्छेदन करण्यात आलेल्या शासकीय रुग्णालयाचे नाव

(शव विच्छेदन अहवालाची साक्षांकित प्रत व मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत जोडावी) : ....................................

इ) साक्षीदाराचे नाव व संपर्क क्रं. : ....................................................................

**४) वारसाहक्क प्रमाणपत्र :** अपघाताने/गंभीर आजाराने मृत्यु झालेल्या विद्यार्थ्याचे/विद्यार्थीनीचे वडील/आई/पालक असून संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेनुसार मिळणाऱ्या अर्थसहाय्य रक्कमेचा धनादेश/डी.डी. माझे नावे..........................
.......................पत्ता.....................................................................................
काढून वरील पत्त्यावर पाठविण्यास विनंती.

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेली माहिती सत्य आहे.

**दिनांक : / /२०** | **हक्कदार व्यक्ती/दावाधारक/पालक स्वाक्षरी,**

**ठिकाण :** | **(नावः )**

**(सोबत : आधारकार्ड/ पॅनकार्ड/किंवा शासकीय ओळखपत्र)**

**पडताळणीसाठी २ व्यक्तींची माहिती**

| अ.क्र. | नाव | फोन नंबर | सही |
|---|---|---|---|
| १ | ................................ | ................................ | ................................ |
| २ | ................................ | ................................ | ................................ |

**५) वैद्यकीय उपचाराची माहिती**

अ) रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नाव व पत्ता, संपर्क क्रमांक व वैद्यकीय अधिकाऱ्याचे/वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव : ..........................................................................................

ब) उपचारासाठी झालेला खर्च (खर्चाची मुळ देयके क्रमवार सोबत जोडावी): ..............................................

**६) अपंगत्व आल्याची माहिती**

अ) निकामी झालेले अवयव (उदा.हात, पाय, डोळा इ.) : ..............................................................

ब) अपंगत्व कायमचे/अस्थायी स्वरुपाचे : ............................................................................

..............................................................................................................

## अपघात/कायमचे अपंगत्व/गंभीर आजार दाव्यासोबत महाविद्यालयाने दयावयाचे प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, दि. / /२० ते दि. / /२० असे एकुण ........................ दिवस अपघातामुळे/कायमचे अपंगत्व आल्यामुळे/गंभीर आजारामुळे ........................................ या रुग्णालयात उपचार घेत असल्याने, महाविद्यालयात गैरहजर होता/होती.

प्रस्तावासोबत जोडलेले सर्व वैद्यकीय कागदपत्रे तपासले असुन, सर्व कागदपत्रे साक्षांकित व बरोबर असल्याचे खात्री केली. सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीस विद्यापीठ नियमानुसार झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती मिळणेकरीता शिफारस करत आहे.

**महाविद्यालयाचा शिक्का** **अधिष्ठाता/प्राचार्य सही व शिक्का**

**नाव :**

..............................................................................................................

## मृत्यु दाव्यासोबत महाविद्यालयाने दयावयाचे प्रमाणपत्र

दि. / /२० पासुन ................................................ या अपघाताने /गंभीर रोगाने आजारी असल्याने दि. / /२० रोजी ........................................................................ या रुग्णालयात मृत घोषित करण्यात आला / आली.

प्रस्तावासोबत जोडलेले सर्व वैद्यकीय कागदपत्रे तपासले असुन, सर्व कागदपत्रे साक्षांकित व बरोबर असल्याचे खात्री केली. सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या पालक श्री/सौ. .............................. यांना विद्यापीठ नियमानुसार अर्थसहाय्यता मिळणेकरीता शिफारस करत आहे.

**महाविद्यालयाचा शिक्का** **अधिष्ठाता/प्राचार्य सही व शिक्का**

**नाव :**

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना

## वैद्यकीय प्रमाणपत्र

सदर प्रमाणपत्रासोबत आजारी/अपघात झाल्याबाबतचे पुरावे जोडावे.

**१) आजारी/अपघातग्रस्त विद्यार्थ्याची माहिती**

अ) संपुर्ण नाव : ...........................................................................

ब) वय : ...........................................................................

**२) आजाराचा/अपघाताचा प्रकार व कारण**

अ) अपघातात जखमी/अपंगत्व आल्याचे पुर्ण वर्णन : ...........................................................................

...........................................................................

ब) शरीरावर झालेल्या जखमा अपघातापूर्वी होत्या का ? : ...........................................................................

**३) आजाराअंतर्गत/अपघाताअंतर्गत उपचारासाठी प्रथम कोणत्या तारखेला तपासणी केली ? :** ..................

**४) आजारग्रस्त/अपघातग्रस्त विद्यार्थी सध्या उपचाराने बरा झाला का? नसल्यास किती कालावधी लागला ?**

...........................................................................

**५) आजारग्रस्त/अपघातग्रस्त विद्यार्थी अपघात होण्यापुर्वी एखादया रोगाने आजारी होता का? अशा परीस्थीतीत रुग्णाला बरा होण्यासाठी काही अडथळे आले का? असल्यास तपशिल नमुद करावा ?**

...........................................................................

...........................................................................

**६) रुग्णाची सध्याची परीस्थिती :** ...........................................................................

...........................................................................

**७) कायमचे अपंगत्व आले आहे का ? आले असल्यास अपंगत्वाचे प्रमाण (%) किती आहे.**

...........................................................................

**८) अपंगत्वामध्ये शरीराचे कोणते अवयव निकामी झाले आहेत**

...........................................................................

मी असे प्रमाणित करतो की, सदर रुग्णास मी वैयक्तीक तपासले असून वर नमुद केलेली माहिती खरी आहे.

**स्थळ :**

**दिनांक : / /२०**

**वैद्यकीय व्यावसायिक/ अधिकाऱ्याची स्वाक्षरी :** ..............................

**नाव :** ..............................

**शैक्षणिक पात्रता :** ..............................

**नोंदणी क्रं.** ..............................

**पत्ता :** ..............................

# तपासणी सुची (Check List)

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला दावा अर्ज (क्लेम फॉम) परिपुर्ण भरला आहे काय ? | | |
| २ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र परिपुर्ण भरले आहे काय ? | | |
| ३ | नियमावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे सादर करावयाची कागदपत्रे ? | | |

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

**College Clerk**
**Mob. No.**

**Dean/Principal**
**(Name, signature & Stamp)**